N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** गोंदिया शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0691 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/08/2026 00:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 24/08/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/08/2026
**Time From (वेळेपासून):** 12:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/08/2026 **Time (वेळ):** 23:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/08/2026 00:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा हिवताप कार्यालय, कापसे बिल्डींग सिव्हील लॉईन,गोंदिया, 441601

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** गोंदिया शहर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** गोंदिया(महाराष्ट्र)



CamScanner

प्रति,

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सरतर्फे अरविंद पुंडलिक राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधकविभाग गोंदिय,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधकविभाग गोंदिय,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275298475

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मारोती यादव दिपेवाड | | | 1. पारधी हाऊस, न्यू लक्ष्मीनगर,, बाहेकर नर्सिंग होमजवळ गोंदिया, गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री निरजकुमार नरेश अग्रवाल | | | 1. अंगूर बगीचा रोड,मारोती अपार्टमेंट गोंदिया,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पोस्टेला तक्रार प्राप्त होताच

CamScanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | samsung A33 mobile | 5,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | oppo F29 mobile | 5,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ओडियो कॅसेट | 03 32 GB क्षमतेचे sandisk memory card | 1.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 14 भारतीय चलनी नोटा | 7,000.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | आरोपी क्र.1 यांच्या जिन्सपॅन्ट | 1.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
17,002.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

दिनांक: २४-०८-२०२६
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
गोंदिया
नाव: अरविंद पुंडलिक राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
मो. क्र.: ८२७५२९८४७५

आम्ही शासनातर्फे फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहोत. दिनांक २४-०८-२०२६ रोजी कार्यालयात हजर असताना वेळ १०-३० वा. सुमारास मा. पोलीस उपअधीक्षक श्री. निलेश लोधी यांनी त्यांच्या दालनात बोलवून त्यांच्या समोर बसलेले इसम हे श्री जानेन्द्र कटरे रा. डोंगरगाव (खडकी) पोष्ट चिखली, ता. तिरोडा जि. गोंदिया असे असून यांची हिवताप कार्यालय गोंदिया येथील श्री अग्रवाल व श्री दिपेवाड यांचे विरुद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याने त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास सांगून पुढील कारवाईबाबत मार्गदर्शन केले. त्यावरून तक्रारदार यांना आपले कक्षात नेवून त्यांना त्यांचे नाव गाव व तक्रारीसंबंधाने विचारपूस करून त्यांची तक्रार लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून दिली ती खालीलप्रमाणे आहे.
तक्रार

दिनांक २४-०८-२०२६
प्रति,
मा. पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया.

विषय: श्री. निरजकुमार अग्रवाल व श्री. दिपेवाड दोन्ही जिल्हा हिवताप कार्यालय ता. जि-गोंदिया यांचे विरुद्ध लाच मागणी संबंधाने कायदेशीर कारवाई करण्याबाबत.



CamScanner

अर्जदार: श्री जानेन्द्र योद्धासिंग कटरे वय ४३ वर्ष, व्यवसाय शेती, रा. डोंगरगाव (खडकी) पोष्ट चिखली, ता. तिरोडा जि. गोंदिया मो-क्र- ८६६९२५८३८०.

महोदय,

सविनय सेवेशी तक्रार सादर करतो की, मी वरील पत्त्यावर आपले परिवारासह राहतो व शेतीचे कामे करतो. माझे वडील नामे योद्धासिंग आलाराम कटरे हे जिल्हा हिवताप विभागात आरोग्य सहायक या पदावर प्राथमिक आरोग्य केंद्र चोपा येथे कार्यरत असताना नियमित वयोमानाने सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत आणि दिनांक २१-०२-२०२६ रोजी कर्करोगाचे आजाराने मरण पावले आहेत. माझी आई नामे चंद्रकला योद्धासिंग कटरे ह्या वयोवृद्ध असून त्या माझ्याकडे राहण्यास आहेत, त्यांचा सांभाळ मीच करतो.

वडिलांचे मृत्यूनंतर माहे मार्च २०२६ मध्ये शेवटच्या आठवड्यात आईला मिळणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनाबाबतची माहिती विचारण्याकरीता जिल्हा हिवताप कार्यालय, कापसे बिल्डींग सिव्हील लाईन गोंदिया येथे जावून येथील कर्मचाऱ्यास भेटलो असता त्यांनी कुटुंब निवृत्ती वेतनासाठी लागणारे कागदपत्र विषयी माहिती देवून तुमच्या वडिलांचा नक्षल प्रोत्साहन भत्त्याचा एरीअर्स देखील आहे तो काढावा लागेल असे सांगून आईचे बँक अकाऊंट व आधार कार्ड जमा करण्यास सांगितले. त्यानुसार मी माहे जुन २०२६ मध्ये माझे आईचे बँक अकाऊंट, आधारकार्ड व आईचे नावाने अर्ज जिल्हा हिवताप कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री निरजकुमार अग्रवाल यांचेकडे जमा केले तेव्हा त्यांनी तुमच्या वडिलांचा नक्षल प्रोत्साहन भत्त्याचा एरीअर्स काढून देतो त्यासाठी तुम्हाला रु- ६०००/- द्यावे लागतील असे सांगितले तेव्हा मी त्यांना नाईलाजास्तव ठीक आहे असे म्हणून आपले गावी निघून आलो.

माहे जुन/२०२६ मध्ये एरीअर्सचे बिल न निघाल्याने मी दिनांक २३-०७-२०२६ रोजी त्यांच्या कार्यालयात जावून निरजकुमार अग्रवाल यांना भेटून एरीअर्स बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचेच कार्यालयातील लिपीक श्री दिपेवाड यांना भेटण्यास सांगितल्याने मी त्यांना भेटून आपला परिचय दिला व अग्रवाल साहेबांनी आपल्याकडे पाठविले आहे असे सांगून वडिलांचे एरीअर्स बिलाबाबत विचारले. तेव्हा त्यांनी एरीअर्स बिल काढून देण्यासाठी स्वतः चे हातावर रु- ७०००/- लिहून मला दाखवून एवढे लागतील असे सांगितले. तेव्हा त्यांना ठीक आहे असे म्हणून निघून आलो.

त्यानंतर दिनांक २९-०७-२०२६ रोजी माझे मोबाईल क्रमांकावरून निरजकुमार अग्रवाल यांचे मोबाईल क्रमांक ९८२३७९२१६९ वर संपर्क करून त्यांना वडिलांचे एरीअर्स बिल निघाले का म्हणून विचारणा केली असता त्यांनी माहे जुलैच्या शेवट पर्यंत बिल निघून जाईल असे सांगितले. परंतु जुलै महिना संपूर्ण पंधरा दिवस होवूनसुद्धा माझे वडिलांचे एरीअर्स बिल निघाले नसल्याने दिनांक २१-०८-२०२६ रोजी श्री अग्रवाल यांना फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यामुळे मी, श्री दिपेवाड यांचे मोबाईल क्रमांक ८९७५३६०६९४ वर संपर्क करून एरीअर्स बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी ते सध्या बाहेर असल्याचे सांगून तुम्हाला यापूर्वी सांगीतल्याप्रमाणे सोमवारी पैसे घेवून या तुमचे काम होवून जाईल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना ठीक आहे सोमवारला भेटतो सर असे म्हणालो.

श्री. निरजकुमार अग्रवाल व श्री. दिपेवाड, दोन्ही जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया हे मला मागत असलेले ७०००/- रुपये शासकीय फिस नसून लाच रक्कम असल्याची माझी खात्री पटली आहे. त्यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे येवून तक्रार देत आहे. त्यांच्या बरोबर माझे कुठलेही आर्थिक देवाण-घेवाण अथवा वैर्भव नाही. तरी, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कारवाई आयोजित करण्यासाठी मा. अप्पर तहसीलदार, तहसीलदार कार्यालय गोंदिया यांना पत्र देवून दोन शासकीय पंचा नामे श्री. अरुण प्रेमलाल निखारे वय-५२ वर्ष पद- ग्राम महसूल अधिकारी व श्री. गोवर्धन भागवत हटवार वय ५१ वर्ष पद- ग्राम महसूल अधिकारी, दोन्ही तहसील कार्यालय गोंदिया यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांना तक्रारदाराने लोकसेवकांविरुद्ध लाच मागणी संबंधी तक्रार नोंदविलेली असून त्या तक्रारीवर लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई करून पुढील कायदेशीर कारवाई करावयाची आहे असे सांगून त्यांची संमती विचारली असता त्यांनी संमती दिल्याने श्री. अरुण प्रेमलाल निखारे यांना पंच क्र- १ तर श्री. गोवर्धन भागवत हटवार यांना पंच क्र- २ म्हणून ठरविण्यात आले.

सापळा पथकाचा तसेच तक्रारदार यांचा दोन्ही पंचांना परिचय करून देवून यांची दोन लोकसेवकांविरुद्ध लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे सांगून तक्रारदार यांची लिखित तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचून त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर आम्ही स्वाक्षरी केली.

त्यानंतर गैर-अर्जदार श्री. अग्रवाल लिपीक व श्री दिपेवाड लिपीक, जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांना लाचेमध्ये



CamScanner
CamScanner

देण्यासाठी रु. ७,०००/- हजर करण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी स्वतःच्या बचतीतून त्यांच्याकडे जमा असलेल्या रु. ५००/- दराच्या १४ भारतीय चलनी नोटा असे एकूण रु. ७०००/- आमचेकडे जमा केले. त्या नोटांच्या क्रमांकाची यादी तयार करण्यात आली.

तक्रारदार व दोन्ही पंच यांना सदर कारवाईमध्ये उपयोगात येणाऱ्या अँथ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट लॅम्प त्यांचे वैशिष्ट्ये समजावून सांगून पोलीस अंमलदार यांचे मार्फत त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे सदर कारवाईदरम्यान तक्रारदार व गैर-अर्जदार लोकसेवक यांचेत होणारे संभाषण कार्यालयीन व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये कशाप्रकारे ध्वनीमुद्रीत करण्यात येते यासंबंधाने व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती देवून त्याचे देखील प्रात्यक्षिक पोलीस अंमलदार यांचे मार्फत करून दाखविण्यात आले. त्यानंतर सदर नोटांना दोन्ही बाजूने अँथ्रासीन पावडर लावून अँथ्रासीन पावडर लावलेल्या चलनी नोटा एकूण रु. ७,०००/- एका कागदी लिफाफ्यात टाकून तो लिफाफा तात्पुरता ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवून दिला.

त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्र- १ यांस सह जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया येथे पाठवून गैर-अर्जदार यांच्या विरुद्धची लाच मागणी पडताळणी कारवाई करण्याचे तसेच सदर कारवाई स्थानिक असल्याने ला-प्र-वि-कार्यालय गोंदिया येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कारवाईतील सदस्यांना लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सूचना सांगून पंच क्रमांक १ यांचे हस्ते तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये सॅनडिस्क कंपनीचा नविन मेमरी कार्ड सिरीयल क्र- १५१४XV१६२५FU चा टाकून व्हाईस रेकॉर्डर वेळ १२-५९ वाजता सुरु करून पंच क्र- १ व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कारवाई करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून तो व्हाईस रेकॉर्डर कापडी पिशवीत ठेवून तक्रारदार यांचे गळ्यामध्ये शर्टचे आत दोरीने लटकावून पंच क्र- १ यांचे सोबत तक्रारदार यांचे स्कुटी क्र. MH-35/AQ-9607 ने गैर-अर्जदार यांच्याशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरिता जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया येथे पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र- २ व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला-प्र-वि-कार्यालयातच थांबून राहिलो.

तक्रारदार हे गैर-अर्जदार श्री अग्रवाल व श्री दिपेवाड दोन्ही जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांचेशी बोलणी करून पंच क्र- १ यांचेसह ला-प्र-वि-कार्यालय गोंदिया येथे परत आल्यावर त्यांचे गळ्यात असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढून पंच क्र- १ यांचे आवाजात वेळ १४-०६ वाजता बंद करण्यात आले. व्हाईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260824_1259.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले. सदर फाईल मधील संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविल्यावर त्यांच्यात झालेल्या संभाषणावरून गैर-अर्जदार दिपेवाड यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडिलांचे नक्षल प्रोत्साहन भत्याचे एरीअर्स बिल काढून देण्याकरिता रु-७,०००/- लाच रक्कमेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली व त्यास गैर-अर्जदार श्री अग्रवाल यांनी प्रोत्साहन दिल्याने तक्रारदार यांनी गैर-अर्जदार दिपेवाड यांना लाचेची रक्कम ए-टी-एम-मधून काढून आणून देतो असे सांगितलेले असल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. त्यावरून दोन्ही गैर-अर्जदार यांच्या विरुद्धची सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर आमचे सूचनेवरून पंच क्र- १ यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतल्यानंतर पंच क्र- १ यांनी लिफाफ्यातून लाच रक्कम बाहेर काढून तक्रारदार यांचे फुलपँटचे समोरील खिशात ठेवून दिली.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सूचना दिल्या. त्याचप्रमाणे अधिनस्त अंमलदार यांना गैर-अर्जदार यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा तक्रारदार यांनी नियोजित इशारा केल्यानंतर पुढील कारवाईचे कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रीकरण करावे अशा सूचना देवून मोबाईलमध्ये ३२ जीबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र- २१६७DXHAN1A3 असलेला एक नविन मेमरी कार्ड पंचासमक्ष काढण्यात येवून मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये Insert केले. मोबाईल सेटिंग मध्ये जावून सदरचे मेमरीकार्ड मध्ये पूर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची पंचांना खात्री करून दिली व सदरचे मोबाईलमध्ये व्हिडिओ चित्रीकरण करण्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमधून लाच मागणी पडताळणी दरम्यान वापरण्यात आलेले मेमरी कार्ड बाहेर काढून त्याचे प्लास्टिक आवरणात ठेवून ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिले व एक नविन ३२ जीबी क्षमतेचा सॅनडिस्क कंपनीचा सिरीयल क्र- २१६७DXHFA0LZ चा असलेला मेमरी कार्ड पंचासमक्ष काढून सदर डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले. वेळ १५-२७ वा. व्हाईस रेकॉर्ड सुरु करून त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र- १ यांचे आवाजात लाच रक्कम देण्यासाठी गैर-अर्जदार यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाईस रेकॉर्डर कापडी पिशवीत ठेवून तक्रारदार यांचे गळ्यात दोरीचे सहाय्याने शर्टचे आत लटकावून पंच क्र- १ यांचेसोबत तक्रारदार यांचे



CamScanner

स्कुटीने गैर-अर्जदार यांना लाच रक्कम देण्यासाठी जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया येथे पाठविण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र- २, सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो व जिल्हा हिवताप कार्यालयाचे जवळ पोहोचून तक्रारदार यांचे नियोजीत इशाऱ्याची वाट पाहत बसलो. काही वेळानंतर तक्रारदार यांनी त्यांचे फुलपँटचे खिशातून रुमाल काढून हातात ठेवून गैर-अर्जदार यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजित इशारा केल्यावर सापळा पथकासह जावून गैर-अर्जदार मारोती यादव दिपेवाड, पद-आरोग्य सेवक, जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांना लाच रक्कमेसह तसेच गैर-अर्जदार निरजकुमार नरेश अग्रवाल पद-वरिष्ठ लिपीक, जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांना ताब्यात घेवून कारवाई केली. सदर कारवाईचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यात आले आहे. तक्रारदार यांचे गळ्यात लटकावून असलेले व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढून त्यामध्ये पंच क्र- १ यांचे आवाजात सापळा कारवाई पूर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून व्हाईस रेकॉर्डर १६-३० वाजता बंद करण्यात आले. व्हाईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260824_1527.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले.

लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व गैर-अर्जदार यांतील झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणाची स्क्रीप्ट तयार करून त्यास परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब असे शीर्षक देण्यात आले. सदर संभाषण फाईलची हॅश व्हॅल्यू काढून सदरचे मेमरी कार्ड हिरव्या रंगाच्या कागदी वेगवेगळ्या लिफाफ्यात ठेवून त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या करून ते लिफाफे कार्यालयीन सीलने सीलबंद करून ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिले.

याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनाम्यात घेण्यात आल्या आहेत.

तरी, तक्रारदार श्री जानेन्द्र योद्धासिंग कटरे वय ४३ वर्ष, व्यवसाय शेती, रा. डोंगरगाव (खडकी) पोष्ट चिखली, ता. तिरोडा जि. गोंदिया यांनी दिनांक २४-८-२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २४-०८-२०२६ रोजीचे वेळ १२-५९ वा ते १६-३० वा दरम्यान पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री मारोती यादव दिपेवाड वय ३९ वर्ष, पद-आरोग्य सेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडिलांचे नक्षल प्रोत्साहन भत्त्याचे एरीअर्स बिल काढून देण्याकरिता रु-७,०००/- लाच रक्कमेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारली व त्यास श्री निरजकुमार नरेश अग्रवाल वय ४० वर्ष पद-वरिष्ठ लिपीक जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांनी प्रोत्साहन देवून दोन्ही लोकसेवकांनी आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेतला आहे म्हणून श्री मारोती यादव दिपेवाड व श्री निरजकुमार नरेश अग्रवाल, दोन्ही जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) चे कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा नोंद होण्याकरिता कायदेशीर फिर्याद देत आहे.

(अरविंद राऊत)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



CamScanner

CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

स्टेशन डायरी अमलदार
गोंदिया शहर पोलीस ठाणे

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVIN DEVAJI BOR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402PDBM810

PS ACB Gondia

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: YES |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: YES |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



CamScanner
CamScanner